महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

# यु.पी.एस.सी. नागरी सेवा मुख्य परीक्षा 2023 साठी आर्थिक सहाय्य योजनेचे तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जे उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोग - पुर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** : केंद्रीय लोकसेवा आयोग - पुर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व नागरी सेवा मुख्य परिक्षेसाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :-**

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. तसेच नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गा पैकी असावा.
2. विद्यार्थी हा दि.12/06/2023 रोजी केंद्रीय लोकसेवा आयोग - पुर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
3. केंद्रीय लोकसेवा आयोग - मुख्य परिक्षेसाठी पात्र असावा.
4. ज्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था / सारथी, पुणे कडून अर्थसहाय्य मिळत आहे किंवा त्यासाठी अर्ज केला आहे अश्या उमेदवारांना सदर योजनाच्या लाभासाठी अर्ज करता येणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे :-**

1. आधार कार्ड
2. रहिवासी दाखला
3. जातीचा प्रमाणपत्र
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
5. पूर्व परीक्षेचे प्रवेश पत्र
6. बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक)
7. पूर्व परिक्षा उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा)

**अर्ज कसा करावा :-**

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For UPSC Mains -2023"** (Civil Services) यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्ज करण्याचा अंतिम दि.03/07/2023 आहे.
3. अर्जासोबत ओळखपत्र, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला, रहिवासी दाखला, पूर्व परिक्षेचे प्रवेश पत्र, बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक) आदि कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रे स्व-सांक्षाकिंत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावी.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
5. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :

   **0712-2870120/21.**

   **E-mail Id :** mahajyotimpsc21@gmail.com

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर